**नियमित दिवाणी दावा क्र.१५१/२०१३**

(वसंत वि. विलास व इतर)

**CNR No.MHSO07-000238-2013**

## <u>निशाणी क्र.५४ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द होऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत स्वीकारणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, त्यांना सदर दाव्याचे समन्स वैयक्तिकरित्या बजावलेले नाही. रे.मु.नं.२२५/२०२१ च्या दाव्यामध्ये त्यांच्या पत्नीला उलटतपासामध्ये सदर दाव्यासंदर्भात प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी सदर दाव्याच्या सहीशिक्क्याची नक्कल काढल्यानंतर त्यांना सदर दाव्याची माहिती झाली. त्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आले नाही. त्यांना नऊ वर्षांचा विलंब झालेला आहे. सबब, त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात यावे आणि त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत स्वीकारणेत यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास १०,०००/- रुपये खर्चाची आकारणी करण्याची विनंती केली आहे.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट आहे की, प्रतिवादीचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या बचावाची संधी देखील मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीच्या विनंतीनुसार त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द न केल्यास आणि त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत न स्वीकारल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू

तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. त्यामुळे खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये २,०००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र.६ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी. |
| ३. | प्रतिवादी क्र.६ यांनी वरील प्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येत आहे. तसेच त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे. |

PRAVIN PUNDLIK BAGUL

Digitally signed by PRAVIN PUNDLIK BAGUL
Date: 2024.09.11 15:21:52 +0530

(पा. पा. बागुल)

दिनांकः– १०.०९.२०२४

४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 10.09.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 10.09.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 11.09.2024 |